आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
८ एप्रिल २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- खरीप हंगामासाठी स्फुरद आणि पोटॅश खतांवरच्या पोषक तत्त्वांवर आधारित अनुदान दरांना केंद्र सरकारची  मंजुरी

- देशात कोळसा, गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असल्याची सरकारची ग्वाही

- व्याजदर जैसे थे ठेवण्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय, युद्धाच्या परिणामांबाबत सावध पवित्रा

- आसाम, केरळम आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी प्रशासन सज्ज

- इराणला शस्त्रास्त्र पुरवणाऱ्या देशावर ५० टक्के आयातशुल्क लावण्याचा डोनाल्ड ट्रंप यांचा इशारा

आणि

- काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी केंद्रीय मंत्री मोहसीना किडवई यांचं निधन

**<><><><><>**

यंदाच्या खरीप हंगामासाठी स्फुरद आणि पोटॅश खतांसाठी पोषक तत्त्वांवर आधारित अनुदान दरांना केंद्र सरकारनं आज मंजुरी दिली. त्यासाठी ४१ हजार ५३३ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करावी लागणार असल्याचं माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. गेल्या वर्षीच्या तुलनेत  अनुदानात चार हजार ३१७ कोटी रुपयांची वाढ केली आहे.

**- - - होल्ड - - -(१६ सेकंद)**

त्याबरोबर सरकारनं आज ४१ किलोमीटरच्या जयपूर मेट्रोच्या प्रल्हादपूर ते तोडी मोड या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी दिली. HPCL राजस्थान रिफायनरी लिमिटेड म्हणजेच HRRL 'प्रकल्पाच्या सुधारित खर्चाला तसंच अरुणाचल प्रदेशातल्या 'कमला जलविद्युत प्रकल्पा'च्या बांधकामासाठी २६ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीलाही मंत्रिमंडळ समितीनं मान्यता दिली.

**<><><><><>**

इराण विरुद्ध अमेरिका आणि इस्राएल दरम्यान तात्पुरत्या युद्धबंदीचं भारतानं स्वागत केलं आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज नवी दिल्लीत आंतरमंत्रालयीन पत्रकार परिषदेत सांगितलं की पश्चिम आशियात शाश्वत शांतता नांदावी अशी भारताची भूमिका आहे. आता होर्मुझमधून जलवाहतूक सुरळीत होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**- - - होल्ड - - (१२ सेकंद)**

पश्चिम आशियातल्या युद्धस्थितीमध्येही देशाच्या कोळसा खाणींमध्ये आणि वीज निर्मिती केंद्रांमध्ये कोळशाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचं कोळसा मंत्रालयाचे संयुक्त सचिव संजीव कुमार कास्सी यांनी सांगितलं. कोळशाच्या दरात कोणतीही वाढ झाली नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. देशात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी गॅस पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून त्याचा नियमित पुरवठा होत असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयांच्या सचिव सुजाता शर्मा यांनी यावेळी दिली. देशात जहाज आणि जलवाहतूक सुरळीत सुरु असून कुठेही जहाजांची कोंडी झालेली नसल्याचं बंदरे आणि जलवाहतूक मंत्रालयाचे सहसचिव मुकेश मंगल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पोलाद क्षेत्रानं गेल्या आर्थिक वर्षात दमदार कामगिरी केल्याचं पोलाद मंत्रालयानं म्हटलं आहे. मजबूत देशान्तर्गत मागणी आणि वेगानं सुधारणाऱ्या पायाभूत सुविधांमुळे उत्पादन, खप आणि निर्यातीत मोठी वाढ झाल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

मंत्रालयानं जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, २०२५-२६ या आर्थिक वर्षात देशातलं कच्च्या पोलादाचं उत्पादन वार्षिक १० पूर्णांक ७ दशांश टक्क्यांनी वाढलं, तर तयार पोलादाच्या निर्यातीत ३५ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांची वाढ झाली तसंच आयातीत ३१ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांनी घट झाली आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात देशाची पोलाद उत्पादन क्षमता २२ कोटी टनांवर पोहोचली असून २०३० पर्यंत ती ३० कोटी टनांवर पोहोचवण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दरात पुढच्या दोन महिन्यासाठी कोणताही बदल केला नसून, तो सव्वा पाच टक्के इतका कायम ठेवला आहे. मुंबईत बँकेच्या पतधोरण समितीच्या

बैठकीनंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी ही माहिती दिली. गेल्या आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांवर तर चालू आर्थिक वर्षात हा दर ६ पूर्णांक ९ दशांश टक्के राहील, अशी शक्यता रिझर्व्ह बँकेनं व्यक्त केली आहे. चालू आर्थिक वर्षात किरकोळ महागाई दर ४ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल, असाही रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे.

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळं देशाच्या आर्थिक वृद्धीदरावर विपरीत परिणाम होईल, असं मत गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी मांडलं आहे. या संघर्षावर wait and watch अशी भूमिका घेतानाच तिकडच्या परिस्थिती बाबत सजग राहून संभाव्य आव्हानांवर लक्ष ठेवण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतल्याचं गव्हर्नर म्हणाले. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत असून पूर्वीपेक्षा परिस्थिती अधिक चांगली असल्याचंही त्यांनी नमूद केलं. युद्धाच्या काळात सरकारनं केलेल्या विविध उपाययोजनांमुळं युद्धाचा परिणाम कमी व्हायला मदत झाल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

आसाम, केरळम आणि पुद्दुचेरीमध्ये उद्या होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची तयारी प्रशासनकडून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, केरळममध्ये मतदानादरम्यान सर्व नियमांचं कसोशीनं पालन करण्याच्या सूचना आयोगानं दिल्या आहेत.

आसाममध्ये १२६ विधानसभा मतदारसंघात होणाऱ्या मतदानासाठी उभारण्यात आलेल्या मतदानकेंद्रावर दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

पुद्दुचेरीमध्ये उष्णतेची लाट असल्यानं मतदारांना मतदान केंद्रांवर पिण्याचं पाणी उपलब्ध करून देण्याची सूचना जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे.

पश्चिम बंगालमधल्या विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपणार आहे. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख तसंच राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज भवानीपूर इथून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

बंगाल विधानसभा निवडणूक भयमुक्त वातावरणात व्हाव्यात अशी मागणी भाजपाने आज निवडणूक आयोगाकडे केली. केंद्रीय मंत्री डॉ. विरेंद्र कुमार यांच्या नेतृत्वात पक्षाच्या शिष्टमंडळानं निवडणूक आयोगाची भेट घेऊन यावर चर्चा केली. या दृष्टीनं पुरेशी काळजी घेण्यात आल्याचं आयोगाने सांगितलं.

**<><><><><>**

कर्नाटकातल्या बागलकोट आणि दावणगिरी दक्षिण विधानसभा जागांसाठी तसंच त्रिपुरातल्या धरमनगर इथं उद्या पोटनिवडणुकीसाठी मतदान  होणार आहे.

गोव्यातल्या फोंडा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची अधिसूचना मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा पीठाने रद्दबातल ठरवली आहे.

<><><><><>

इराणला शस्त्रास्त्र पुरवणाऱ्या देशावर ५० टक्के आयातशुल्क लावण्याचा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी दिला आहे. हे धोरण तातडीनं लागू करणार असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

इराणबरोबरच्या युद्धविरामाच्या घोषणेनंतर भारतीय शेअर बाजारात जोरदार तेजी पाहायला मिळाली. सेन्सेक्समध्ये दिवसअखेर २ हजार ९४६ अंकांची वाढ झाली आणि तो ७७ हजार ५६३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ८७४ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ९९७ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी केंद्रीय मंत्री मोहसीना किडवई यांचं आज नोएडा इथल्या रुग्णालयात निधन झालं. त्या ९४ वर्षांच्या होत्या. उत्तर प्रदेशातल्या मेरठ मतदार संघाचं प्रतिनिधित्व त्यांनी सलग ३ वेळा केलं. २००४ ते २०१६ या काळात त्या छत्तीसगढ मधून राज्यसभेवर निवडून गेल्या होत्या. केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांनी ग्रामविकास, आरोग्य आणि कुटुंबकल्याण, परिवहन, नगरविकास अशा विविध खात्यांचं मंत्रिपद सांभाळलं. काँग्रेसच्या अखिल भारतीय कार्यकारिणीच्या त्या सदस्य होत्या. नोएडामधे त्यांच्या पार्थिवावर दफनसंस्कार करण्यात आले.

मोहसीना किडवई यांच्या निधनाबद्दल अनेक मान्यवरांनी दुःख व्यक्त केलं आहे.

//<><><><><>//